घरबांधणी अग्रिम
अग्रिमाच्या रकमेत तसेच घरांच्या किंमत मर्यादेत सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन शुध्दीपत्र, क्रमांक- घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०१५.

वाचा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/ विनियम, दि.२०.०२.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक-घबांअ-१०.११/प्र.क्र.५६/२०११/ विनियम, दि.२७.०२.२०१२.

शुध्दीपत्र :

घरांच्या किंमतीत विशेषत: शहरी भागात सातत्याने होणारी वाढ विचारात घेऊन घरबांधणी अग्रिमाच्या रकमेत तसेच घराच्या किंमत मर्यादेत उपरोक्त संदर्भीय दि.२०.०२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. शासनाकडे प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयाच्या परि.११ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

परिच्छेद क्र.११:-

मूळ परिच्छेद : “हे आदेश सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील. यापूर्वी मंजूर करण्यात आलेली अग्रिमाची प्रकरणे पुन्हा नव्याने उघडण्यात येऊ नयेत.”

सुधारणा : “हे आदेश सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून (दि.२०.०२.२०१५) पासून अंमलात येतील. तथापि, ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना संदर्भीय शासन निर्णय दि.२७.०२.२०१२ अन्वये, घरबांधणी अग्रिमाची रक्कम एकापेक्षा अधिक हप्त्यात मंजूर केली असेल व अग्रिम धारकास दि.२०.०२.२०१५ पर्यंत अग्रिमाचे सर्व हप्ते वितरीत केले नसतील अशा प्रकरणी संबंधित अग्रिम धारकास सदर शासन निर्णयानुसार या शासन निर्णयात नमूद सर्व अटी/शर्तीच्या अधीन अग्रिम अनुज्ञेय करता येईल.”

२. सदर शासन शुध्दीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक २०१५१०१२१३१४१०१९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Bhaskar Ringane
Digitally signed by Narayan Bhaskar Ringane
DN: CN = Narayan Bhaskar Ringane, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.10.12 15:05:56 +05'30'

(ना.भा.रिंगणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१) * प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र,मुंबई ४०० ०२०
२) * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०

३) * महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
४) * महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
५) * राज्यपालांचे सचिव
६) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
७) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
८) सर्व विधानमंडळ सदस्य
९) मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१०) अपर मुख्य सचिव, राज्य निवडणूक आयोग.
११) मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभाग
१२) राज्य निवडणूक आयोग.
१३) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०० ०५१
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१६) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१७) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकणभवन, नवी मुंबई
१८) * प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
१९) * प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
२०) * प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई
२१) * प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२२) * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२३) * प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय मादाम कामा रोड, मुंबई
२४) * प्रमुख न्यायाधिश, कुटुंब न्यायालय, नागपूर / मुंबई, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१
२५) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली .
२६) उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग,कोकण भवन,नवी मुंबई/ पुणे /नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती
२७) उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद / नाशिक/ अमरावती
२८) सर्व उप कोषागार अधिकारी
२९) मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख
३०) सर्व विभागीय आयुक्त
३१) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३२) सर्व जिल्हाधिकारी
३३) महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१
३४) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३६) सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी
३७) संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८, स्टेट एम्पोरिया इमारत, बाबा खरकसिंग मार्ग, नवी दिल्ली ११०००१
३८) बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१

३९) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर,वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई४०० ०२०,

४०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही,पटेल रोड, मुंबई-४०० ००४

४१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई

४२) इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेय (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००0२

४३) नॅशनलीस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री पेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१.

४४) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८,

४५) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, दादर, मुंबई- ४०० ०२८,

४६) वित्त विभागातील सर्व कार्यासने.

४७) निवड नस्ती, विनियम, वित्त विभाग.

*पत्राव्दारे.